
14-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/13/2025 11:25 PM Page 1




मोरजीचा समुद्रकिनारा स्विमिंग झोन करू नये
पान २ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रोहित-हार्दिकमधील वाद मिटणार
पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, १४ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 191 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 14 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### सिसोदियांविरोधात चौकशीला मान्यता

नवी दिल्ली, दि. १३ : गृह मंत्रालयाने दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि मंत्री सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध चौकशीला मान्यता दिली आहे. मंत्रालयाने गुरुवारी उपराज्यपालांच्या सचिवालयाला कळवले की, भ्रष्टाचार प्रकरणात दोघांविरुद्ध चौकशीला मंजुरी देण्यात आली आहे. मनीष सिसोदिया यांच्यावर उत्पादन शुल्क धोरण आणि सत्येंद्र जैन मनी लाँड्रिंग प्रकरणात चौकशी सुरू आहे. दोघेही सध्या जामिनावर आहेत. गृह मंत्रालयाच्या मंजुरीनंतर, दोन्ही प्रकरणांमधील तपास प्रक्रिया जलद होण्याची शक्यता आहे. यापूर्वी ११ मार्च रोजी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने सरकारी निधीच्या गैरवापराच्या प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले होते. केजरीवाल यांच्यावर प्रसिद्धीसाठी मोठे होर्डिंग्ज लावण्यासाठी सार्वजनिक पैशाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. केजरीवाल आणि इतर दोन नेते गुलाब सिंग आणि नीतिका शर्मा यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने दिल्ली पोलिसांना गुन्हा नोंदवण्याचे निर्देश दिले.

---

### मार्क कार्नी यांचा आज शपथविधी

कॅनडा, दि. १३ : कॅनडाचे नवे पंतप्रधान मार्क कार्नी यांचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे शुक्रवार १४ मार्च रोजी होणार आहे. कॅनडाचे २४ वे पंतप्रधान म्हणून ते शपथ घेतील. शपथविधी सोहळा भारतीय वेळेनुसार रात्री ८:३० वाजता राजधानी ओटावा येथील रिडो हॉलच्या बॉलरूममध्ये होईल. कार्नी यांच्याव्यतिरिक्त त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यही शुक्रवारी शपथ घेतील. ९ फेब्रुवारी रोजी झालेल्या लिबरल पक्षाच्या नेत्याच्या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला. कार्नी यांना ८५.९% मते मिळाली. मार्क कार्नी हे कॅनडाचे विद्यमान पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची जागा घेतील. पक्षनेत्याची निवडणूक जिंकल्यानंतर कार्नी यांनी पंतप्रधान ट्रुडो यांची भेट घेतली. दोघांमध्ये सत्ता हस्तांतरणाबाबत चर्चा झाली. जानेवारीमध्ये ट्रुडो यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. शुक्रवारी, ट्रुडो गव्हर्नर जनरलकडे जातील आणि अधिकृतपणे राजीनामा सादर करतील.

---

### प्रवाशांची सुटका; ३० बंडखोर ठार

कराची, दि. १३ : बलुचिस्तान प्रांतात बंडखोरांनी अपहरण केलेल्या रेल्वेतील १९५ प्रवाशांची सुटका करण्यात आल्याचा आणि ३० बंडखोरांना ठार करण्यात आल्याचा दावा पाकिस्तानी सैन्याने केला आहे. सैन्याच्या दाव्यानुसार बचाव मोहिमेदरम्यान ३७ प्रवासी जखमी झाले असून त्यांना वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले. जाफर एक्स्प्रेस ही ५०० प्रवाशांसह ९ डबे असलेली रेल्वे मंगळवारी क्वेट्टा ते पेशावर मार्गावर होती. गुडलार आणि पीरू कुंरीच्या डोंगराळ भागात एका बोगद्यात सशस्त्र अतिरेक्यांनी ट्रेन थांबवून तिचा ताबा मिळवला. या हल्ल्याची जबाबदारी बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने (बीएलए) स्वीकारली आहे.

### हवामान

कमाल : ३७ किमान : २८
आर्द्रता : ६१

### बाजार भाव

सोने : ₹ ८९,१०५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १, ०९१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# अखेर कलम १७(२) रद्द; उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

## झोनिंग बदलांना आळा : प्रादेशिक आराखड्यानुसारच होणार प्रस्तावांचा विचार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १३ : मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी नगर नियोजन कायद्याच्या (टीसीपी ) कलम १७(२) अंतर्गत लागू करण्यात आलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे रद्द केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे गोव्यातील झोनिंग बदलांची प्रक्रिया थांबेल, ज्यामुळे प्रादेशिक योजनेच्या चौकटीत विकासाचे नियोजन सुसंगत राहणार आहे. गोवा फाऊंडेशन, खाजन सोसायटी ऑफ गोवा आणि गोवा बचाव अभियान या तीन पर्यावरणीय संघटनांनी ही जनहित याचिका दाखल करून कलम १७ (२) रद्द करण्याची मागणी केली होती.**

उच्च न्यायालयाचा निर्णय नगरनियोजन कायद्याच्या कलम १७(२) च्या अर्जांवर केंद्रित होता. न्यायालयाने स्पष्ट केले की कोणत्याही प्रस्तावांचे मूल्यांकन प्रादेशिक योजना २०२१ च्या चौकटीतच केले पाहिजे. स्वतंत्रपणे मूल्यांकन करता येणार नाही आणि विसंगती किंवा सुसंगतीच्या आधारे निर्णय घेतला जाणार नाही. भविष्यातील झोनिंग बदलही प्रादेशिक योजनेच्या चौकटीतच मर्यादित राहतील.

राज्य सरकारने या निर्णयावर सहा आठवड्यांची स्थगिती देण्याची विनंती केली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळून लावत स्पष्ट केले की कलम १७(२) अंतर्गत कोणत्याही अतिरिक्त मंजुरी सध्या दिल्या जाणार नाहीत. यामुळे प्रादेशिक योजनेच्या बाहेर होणाऱ्या अनियंत्रित झोनिंग बदलांना आळा बसेल.



### उच्च न्यायालयात आव्हान देणार

**नगर नियोजन कायद्याच्या (टीसीपी ) कलम १७(२) अंतर्गत लागू करण्यात आलेले नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे रद्द करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. या न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे नगरनियोजन मंत्री विश्वजित राणे यांनी स्पष्ट केले आहे.**

गोवा फाऊंडेशन, गोवा खाजन सोसायटी आणि गोवा बचाव अभियान या पर्यावरणीय संस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. गोवा फाऊंडेशनच्या वकील ॲड. नॉर्मा आल्वारिस म्हणाल्या, हा जनतेचा मोठा विजय आहे. सरकारला आता प्रत्येक प्रस्ताव प्रादेशिक आराखड्यानुसारच विचारात घ्यावा लागेल. चुकीच्या किंवा विसंगतीच्या आधारावर झोन बदलता येणार नाहीत.

कलम १७(२) ची अंमलबजावणी मार्च २०२३ मध्ये सुरू झाली होती. या तरतुदींनुसार खाजगी व्यक्तींना प्रादेशिक योजना २०२१ मधील झोनिंग विसंगती दूर करण्यासाठी अर्ज करण्याची परवानगी होती. मात्र, अनेक मंजुरी वास्तविक त्रुटींऐवजी विसंगतीच्या आधारावर दिल्या गेल्या. यामुळे मोठ्या प्रमाणात खाजगी जमिनींचे रूपांतरण झाले होते.

२०२१ च्या प्रादेशिक आराखड्यात सुमारे ६ कोटी चौरस मीटर जमीन चुकीने खासगी वन, शेतीची जमीन आणि बांधकाम निषिद्ध झोन म्हणून दाखवण्यात आल्याचे व ही जमीन विकासासाठी बदलण्याची आवश्यकता आहे, असे जे विधान मंत्र्यांनी केले होते तेही याचिकादारांनी कोर्टाच्या निदर्शनास आणले होते. अशा मनमानी रूपांतरणांमुळे डोंगर, शेतजमिनी आणि नैसर्गिक आच्छादन असलेली जंगले कायमची नष्ट होत असल्याचे याचिकादारांचे म्हणणे होते.

याचिकादारांनी न्यायालयात दाखवून दिले की, हणजूण येथील एका प्रकरणात मालमत्ता ७४ लाखांना खरेदी करण्यात आली होती आणि झोन बदलानंतर तीच मालमत्ता ६.८ कोटींना विकण्यात आली. तसेच, आसगाव येथील नैसर्गिक आच्छादन असलेल्या मालमत्तेचा व्यवहार ६० कोटी रुपयांत झाला होता.

उच्च न्यायालयाने अद्याप २४ प्रारंभिक झोनिंग बदलांबाबत निर्णय दिलेला नाही. हे प्रकरण सहा आठवड्यांत पुन्हा सुनावणीसाठी घेतले जाणार आहे. या निर्णयामुळे भविष्यातील विकास आणि जमीनवापराचे नियोजन अधिक सुसंगत होईल आणि पर्यावरण तसेच स्थानिक समुदायांचे हित संरक्षित राहील.

गोवा फाऊंडेशनसह इतर पर्यावरणीय संघटनांनी न्यायालयात सादर केलेल्या याचिकेत असा दावा करण्यात आला होता की, सरकारने प्रादेशिक योजनेच्या बाहेर मनमानी झोनिंग बदलांना परवानगी दिली

पान २ ▶

# पोळजी यांच्या आक्षेपार्ह विधानांवर एफआयआर

## काणकोणकर यांचा पोलिसांकडून शोध सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** गोवा आध्यात्मिक महोत्सवाबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी यांच्या विरोधात मुरगाव पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. ब्रह्मेशानंद स्वामी यांच्या अनेक भक्तांनी या विधानांवर आक्षेप घेत पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती.

बायणा बीचवर सद्गुरू फाऊंडेशनच्या वतीने आयोजित या महोत्सवाचा उद्देश आध्यात्मिक आणि सांस्कृतिक एकता प्रस्थापित करणे होता. मात्र, पोळजी यांच्या विधानांमुळे महोत्सव आणि त्यातील सहभागींचा अनादर झाल्याचा आरोप भक्तांनी केला आहे. त्यांच्या विधानांमुळे महोत्सवाच्या प्रतिष्ठेला धक्का बसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे तपास सुरू केला असून, ब्रह्मेशानंद स्वामींच्या भक्तांनी या विधानांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सोशल मीडियावरील पोळजी यांच्या विधानांमुळे आमच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे त्यांना अटक करावी, अशी मागणी ब्रह्मेशानंद स्वामींच्या एका भक्ताने केली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील पुरावे आणि विधाने तपासण्याचे काम सुरू केले असून, कायदेशीर कारवाईबाबत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

दरम्यान, ब्रह्मेशानंद स्वामींची प्रतिमा मलिन करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याच्या आरोपावरून पणजी पोलिसांनी यापूर्वीच सामाजिक कार्यकर्ते रामा काणकोणकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. बुधवारी रात्रीपासून पोलिसांनी विविध पथके स्थापन करून काणकोणकर यांचा शोध सुरू केला आहे. मात्र, अद्याप ते पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

१२ मार्चच्या रात्री ब्रह्मेशानंद स्वामींच्या भक्तांनी मोठ्या संख्येने पणजी पोलिस स्थानकात हजर राहून काणकोणकर यांच्या अटकेची मागणी केली होती. पोलिसांनी त्यानंतर

पान २ ▶

# मडकईकरांचे लाचखोरीचे आरोप भाजपने फेटाळले

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** माजी मंत्री आणि भाजप सदस्य पांडुरंग मडकईकर यांनी सरकारमधील मंत्र्यांवर लावलेले लाचखोरीचे आरोप खोटे असल्याचा दावा भाजपचे राष्ट्रीय सचिव अर्जुन सिंग यांनी केला आहे. या प्रकरणी चौकशीची आवश्यकता आहे का, असा प्रश्न विचारला असता, त्याची गरज नाही, असे सिंग यांनी स्पष्ट केले. मात्र, सिंग यांच्या सोबत उपस्थित असलेले भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक आणि भाजपचे राज्यसभा सदस्य सदानंद शेट तानावडे यांनी या आरोपांवर कोणतीही प्रतिक्रिया न देता मौन बाळगले.

मडकईकर यांनी गेल्या आठवड्यात गोव्यात आलेल्या भाजपचे राष्ट्रीय सचिव बी.एल. संतोष यांना भेटल्यानंतर सरकारमधील मंत्र्यांकडून केवळ लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप माध्यमांसमोर केला होता. त्यांनी एका मंत्र्याला १५ ते २० लाख रुपयांची लाच दिल्याचा दावाही केला होता. मात्र, या आरोपांवर भाजपच्या स्थानिक नेत्यांनी किंवा राज्य सरकारने कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

गोवा दौऱ्यावर असलेल्या अर्जुन सिंग यांनी पत्रकार परिषदेत मडकईकर यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना ते फेटाळले.

**प्रश्न : एका माजी मंत्र्याने आपल्या सरकारमधील मंत्र्याला लाच दिल्याचा आरोप केला आहे. सावंत सरकार यावर काय म्हणते?**

**अर्जुन सिंग :** हे आरोप खोटे आहेत. सावंत सरकार प्रामाणिकपणे काम करत आहे. एका रुपयाचाही भ्रष्टाचार झालेला नाही.

**प्रश्न : आरोप करणारे माजी मंत्री आहेत. पक्ष त्यांच्यावर कारवाई करणार का?**

**अर्जुन सिंग :** सरकार इमानदार आहे. ते खोटे बोलत आहेत.

**प्रश्न : जर मडकईकर खोटे बोलत असतील, तर त्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय सचिवांकडे पदासाठी मागणी का केली असती?**

**अर्जुन सिंग:** जाऊ द्या, हे सर्वांना माहीत आहे.

**प्रश्न: कोणतीही चौकशी न करता मडकईकरांचे आरोप खोटे आहेत, हे तुम्ही कसे ठरवले?**

**अर्जुन सिंग :** सावंत सरकार इमानदार आहे. आमच्यासाठी इमानदारीचा निकष म्हणजे सावंत सरकार आहे.

**प्रश्न : पण मडकईकर हे भाजपचेच नेते आहेत, ना?**

**अर्जुन सिंग:** ते कोण आहेत, याने फरक पडत नाही. सरकार इमानदारीने काम करत आहे.

**प्रश्न : या आरोपांमुळे पक्षाच्या प्रतिमेवर परिणाम होईल असे वाटत नाही का?**

**अर्जुन सिंग:** जाऊ द्या! होळीच्या शुभेच्छा!

# नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण तामिळनाडूने झिडकारले

## एनईपीवरून केंद्र सरकारवर स्टॅलिन यांची टीका | हे राष्ट्रीय नव्हे, तर भगवे धोरण

चेन्नई, दि. १३ :

राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) हे देशाचा नव्हे, तर हिंदीचा विकास करणारे भगवे धोरण असल्याचा आरोप तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी बुधवारी केला. एका जाहीर सभेत बोलताना स्टॅलिन यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आणि एनईपीमुळे तामिळनाडूच्या शिक्षण व्यवस्थेचे नुकसान होईल, असा इशारा दिला.




स्टॅलिन यांनी आरोप केला की, केंद्र सरकार तिसरी आणि पाचवी इयत्तेसाठी सार्वजनिक परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे फिल्टरिंग करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच, नववी ते बारावीच्या परीक्षांना सेमिस्टर पद्धत लागू करण्यात येईल, जी अखिल भारतीय स्वरूपाची असेल. व्यावसायिक शिक्षणाच्या नावाखाली इयत्ता सहावीतून जात-आधारित व्यवसाय लागू करण्यात येणार असल्याचा दावाही त्यांनी केला.

स्टॅलिन म्हणाले की, एनईपी हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना मूळतः विरोध करणारे आहे. हे धोरण अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) यांना मदत रक्कम नाकारते. केंद्राने १० हजार कोटी रुपये दिले तरी हे धोरण स्वीकारले जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

सीमांकनाच्या मुद्द्यावरही स्टॅलिन यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, भाजप उत्तरेकडील राज्यांमध्ये विजय मिळवून सत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. ते प्रभाव असलेल्या राज्यांमध्ये खासदारांची संख्या वाढवून सत्ता मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. मात्र, द्रमुक हे षड्यंत्र उधळून लावेल. स्टॅलिन म्हणाले की, संसदीय जागांच्या सीमांकनामुळे दक्षिण भारतावर तलवार टांगली आहे. हा केवळ तामिळनाडूचाच मुद्दा नसून संपूर्ण दक्षिण भारताला याचा फटका बसणार आहे. त्यांनी सांगितले की, या संदर्भात आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि पंजाब या सात राज्यांतील २९ पक्षांना पत्रे पाठवली असून, २२ मार्च रोजी चेन्नईमध्ये संयुक्त बैठक होणार आहे.

हिंदीच्या प्रोत्साहनावरून केंद्रावर टीका करताना स्टॅलिन म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींना मी सांगतो, हिंदी नव्हे, तर भारताचा विकास करा. तुम्ही हजारो कोटी खर्च केले तरी संस्कृतचा विकास होणार नाही. जनतेला न बोलता येणाऱ्या भाषेला प्रोत्साहन देण्याऐवजी तामिळसारख्या स्थानिक भाषांचा विकास करा. स्टॅलिन यांनी श्रीलंकेकडून तामिळ मच्छिमारांवर होणाऱ्या अन्यायावरही भाष्य केले. ते म्हणाले, मोदी सरकारच्या १० वर्षांच्या कारकीर्दीत ३,हजार मच्छिमारांना अटक करण्यात आली. गेल्या दोन महिन्यांतच १३० मच्छिमारांना अटक झाली आहे.

भाजपच्या धोरणांवर जोरदार टीका करताना स्टॅलिन म्हणाले, केंद्र सरकारच्या फॅसिस्ट कारवायांना आम्ही झुकणार नाही. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, संघराज्यवाद आणि राज्यांच्या स्वायत्ततेच्या तत्त्वांवर आधारित विरोधी एकजूटच भारताला वाचवू शकते. स्टॅलिन यांनी द्रमुक कार्यकर्त्यांना तामिळनाडूच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची शपथ दिली. एनईपी आणि सीमांकनाच्या मुद्द्यावर केंद्राचा निषेध करण्यासाठी 'तामिळनाडू लढेल, तामिळनाडू जिंकेल' या घोषवाक्याखाली राज्यभरात बैठकांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



# तिलारी आंदोलनकर्त्यांना दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

**दोडामार्ग, दि. १३ :** तिलारी धरणक्षेत्रात सुरू असलेल्या बेकायदेशीर खाणी बंद व्हाव्यात म्हणून गेल्या सात दिवसांपासून साखळी उपोषणाला बसलेल्या खानयाळे ग्रामस्थांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दगड खाणकाम आणि गाळप तात्पुरते थांबवण्याचे आदेश देणारे पत्र जारी केले आहे. गेल्या ७ दिवसांपासून दगड खाणकाम आणि गाळप थांबवण्यासाठी ग्रामस्थ आंदोलन करत होते, कारण यामुळे धरणाला धोका निर्माण झाला होता आणि त्यांच्या गावांना पाणी येण्याची भीती होती.

पर्यावरणवादी राजेंद्र केरकर यांनी ग्रामस्थांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सांगितले की महाराष्ट्र सरकारने बेकायदेशीर कारवाया कायमस्वरूपी थांबवाव्यात. केरकर म्हणाले की, गोवा आणि महाराष्ट्र सरकारचा संयुक्त उपक्रम असलेल्या तिलारी धरणातून पेडणे , डिचोली आणि बार्देश तालुक्यांना पाणीपुरवठा होतो. तिलारीच्या पूरग्रस्त भागात स्फोट आणि गाळप करण्याच्या कारवायांमुळे धरणाच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होईल.

बुधवारी, या भागाला भेट देत पर्यावरणवादी रमेश गावस यांनी म्हटले होते की, तिलारीच्या पूरग्रस्त भागात दगड खाणींमध्ये स्फोट करणे धोकादायक आहे कारण त्यामुळे गोव्यातील पर्यटन नष्ट होईल, कारण त्यामुळे तीन तालुक्यांना पाणीपुरवठा प्रभावित होईल. त्यांनी गोवा आणि महाराष्ट्र सरकारांना एकत्र येऊन उत्खनन थांबवण्याचे आवाहन केले.गोवा डब्ल्यूआरडीच्या अधिकाऱ्यांनी बुधवारीही या जागेला भेट दिली होती.